# श्री. सुरेश दिनकर यांना गुरुदक्षिणा

**श्री. सतिश देसाई,** *माजी राष्ट्रीय खो-खो खेळाडू*

नव महाराष्ट्र खो-खो संघाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात सुरेश दिनकर या सरांना गुरुदक्षिणा देण्याची कल्पना जेव्हा पुढे आली तेव्हा माझ्या डोळ्यासमोर सरांची गेल्या ४० वर्षांची कारकीर्द समोर आली. अतिशय शांत स्वभावाचे परंतु खो-खो या खेळावरती, तसेच नव महाराष्ट्र संघावरती आणि आपल्या कुटुंबापेक्षा अधिक स.प. कॉलेजच्या मैदानावरती प्रेम करणारे सर मला दिसले. दररोज सकाळी पावणेसहा वाजता स्पोर्टस्, हाफ पँट आणि टी-शर्ट घातलेले, हातामध्ये छडी घेतलेले सर मला दररोज दिसतात. गेल्या शंभर वर्षात झाला नाही इतका पाऊस पुण्यात जेव्हा झाला तेव्हा कदाचित सर ग्राऊंडवरती नसतील असं मला वाटलं आणि मी छत्री घेऊन ग्राऊंडवरती गेलो तो माझ्यापुढेच आख्या ग्राऊंडवरती श्री. सुरेश दिनकर सर चालत होते. त्या पावसाच्या दिवसात सुद्धा त्यांच्या बरोबर चालण्यात एक वेगळा आनंद होतो. मैदानावरती चालू असलेले दिवे बंद करणे, चालू असलेले पाण्याचे नळ बंद करणे, वाटेत असलेल्या कुत्र्यांना कुरवाळणे, एवढे कमी म्हणून की काय स.प. मैदान झाडणाऱ्या कष्टकरी वर्गाशीसुद्धा दोन शब्द प्रेमाने बोललेले सर मला आठवतात.

त्यांच्या हातात असलेल्या छडीने दररोज सकाळी खो-खो चे मैदान ते आखणार, आलेल्या मुलांना सरावाकरिता तयार करणार, त्यांचा सराव करून घेणार आणि जाता जाता असलेल्या झाडांना पाणीसुद्धा घालणार, परवा जेव्हा त्यांना अतिशय रागावलेल्या अवस्थेत पाहिले तेव्हा मी त्यांना विचारले, की “काय झाले सर ?” तेव्हा ते म्हणाले, “अरे कष्टाने ही झाडे वाढविली, त्यांची फुलं ते काढून घेताहेत. आज फुले काढतील, उद्या झाडे तोडतील म्हणून मी हात लावू नका सांगत होतो.” इतक्या सातव्या पट्टीमध्ये रागावलेले सर कदाचित मला प्रथमच भेटले असतील. खो-खो या खेळावरती आणि आपल्या नव महाराष्ट्र संघावरती टोकाचे प्रेम असणारे सर बरोबर पावणेसात वाजता जेव्हा ग्राऊंड सोडतात तेव्हा घराच्या खाली त्यांच्या सौभाग्यवती वाट पहात असतात आणि मग सात वाजता वहिनींना घेऊन एक कौटुंबिक कर्तव्यसुद्धा ते पार पाडतात.

सन १९७३ ला नव महाराष्ट्र खो-खो संघात मी प्रवेश केल्यानंतर गेल्या ३७ वर्षात सरांनी कधी मैदान चुकविले असेल, असे मला वाटत नाही. अनेक खेळाडूंना मैदानावर घडविताना, त्यांच्यावर खेळाबरोबरच होणाऱ्या चांगल्या संस्कारावरही सरांचे लक्ष असते आणि म्हणूनच नव महाराष्ट्र संघाचे खेळाडू मैदानावर जेवढे चमकतात, तेवढेच अभ्यासामध्ये आणि नंतरच्या आयुष्यामध्ये चमकलेले दिसतात. मुलांच्या सरावाबरोबरच त्यांच्या भवितव्याची सर मनापासून काळजी घेतात. अत्यंत सात्विक, संयमी, समजूतदार, समाधानी, सहनशील, सन्मार्गी, सहजतेने दुसऱ्याला आपलेसे करणारे, कायम स्मितहास्य असणारे श्री. सुरेश दिनकर हे नव महाराष्ट्र संघाचे केवळ कर्ते नाहीत तर त्यांच्या उज्ज्वल भविष्याचे शिल्पकार आहेत. आज जेव्हा नव महाराष्ट्र संघाला ५० वर्षे पूर्ण होतात तेव्हा स्थापनेचा तो दिवस आठवतो. १९६० साली सुरू केलेली संस्था आज इतकी देशामध्ये अग्रगण्य झालेली पहाणे, त्यात सहभागी होणे आणि त्याच्या उज्ज्वल भवितव्याकरिता रात्रंदिवस झटणे हा त्यांच्या सुखी जीवनाचा मूलमंत्र आहे. नव महाराष्ट्र खो-खो संघ भारतामध्ये अग्रगण्य आहे आणि त्याच्यासारखा कुठलाच संघ देशामध्ये इतकी वर्षे टिकला नाही याचे कारण सरांसारखी माणसे झोकून देऊन काम करतात त्या सरांना गुरुदक्षिणा म्हणून जर काही द्यायचे असेल तर तसेच काम खो-खोच्या वृद्धीकरीता आणि खो-खो आंतरराष्ट्रीय पातळीवरती जाण्याकरीता आमच्यामधून होवो हीच सद्भावना !

* * *